म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ७३८
सन १८८८

292
काव्य

॥ २ ॥

अथ

# राममंत्राचे श्लोक.

हें पुस्तक

वासुदेव मोरेश्वर पोतदार

नं. 292
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
संग्रहालय क्रमांक ७३८
लेखक वा. मो. पोतदार
सन १८८८
पुस्तकाचें नांव राममंत्राचे श्लोक

॥ श्रीगणेशाय नमः ॥

श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ॥ नको शास्त्रअ
भ्यास व्युत्पत्ति मोठी ॥ जडे गर्व ताठा अ
भीमान पोटीं ॥ कसा कोणता नेणवे आज
पारे ॥ हरेराम हा मंत्र सोपा जपारे ॥ १ ॥
नको कंठ शोषूं बहूवेदपाठीं ॥ नको तूं पडूं
साधनांचे कपाटीं॥घडे कर्म खोटें बहू तो
दगा रे॥ हरेराम हा मंत्र सोपा० ॥ २ ॥

टीप.१– ह्या सगळ्या ग्रंथांत सर्व श्लोकांतून एकवचनघटित प्रयोग असून ( जपा ) ही क्रिया अनेकवचनी आहे, तेथें ( जपीं ) अशी क्रिया असावी हें योग्य आहे, परंतु परंपरारुढी ( जपा ) असें ह्मणण्याची आहे ह्मणोन तसेंच ठेविलें.

म. ग्रं. २६६



तुला ही तनू मानवी प्राप्त झाली ॥ बहू जन्म पुण्यें फळालागिं आलीं ॥ तिला तूं कसा गोविसी वीषमा रे ॥ हरेराम हा मं० ॥३॥
जरी ही तनू रक्षिसी पुष्ट कांहीं ॥ तरी भोग तो रोग होईल देहीं ॥ विपत्ती पुढें ते नये बोलतां रे ॥ हरेराम हा मंत्र सोपा० ॥ ४ ॥
पुढें हस्तपादादि हे भग्न होती ॥ दिठी मंद होऊनियां कर्ण जाती ॥ तनूकंप सर्वांगिं होती कळा रे ॥ हरेराम हा मंत्र० ॥ ५ ॥
कफें कंठ हा रुद्ध होईल जेव्हां ॥ अकस्मात तो प्राण जाईल तेव्हां ॥ तुला कोण तेथें सखे सोइरे रे ॥ हरेराम हा मंत्र सो० ॥६॥
तुझें बाल्य तारुण्य गेलें निघोनी ॥ कळेना

कसें लोक जाती मरोनी ॥ करीसी मुलाची
स्वहस्तें क्रिया रे ॥ हरेराम हा मंत्र० ॥७॥
दुराशा नको रे परस्त्रीधनांची ॥ नको तूं क-
रूं नीचसेवा जनांची ॥ पराधीन कैसा भ-
ला दीससी रे ॥ हरेराम हा मंत्र सो० ॥८॥
मदें डोलसी बोलसी साधुवृंदा ॥ कसें ही-
त तूं नेणसी बुद्धिमंदा ॥ रिकामाचि तूं गुं-
तसी वाउगा रे ॥ हरेराम हा मंत्र० ॥ ९ ॥
बहु व्याप संताप तो मूळ पापा ॥ गतायु-
ष्य द्रव्यें न ये कोटि बापा ॥ कळेना तुला
कोणता तो नफा रे ॥ हरेराम हा मं० ॥१०॥
तुझे आप्त द्रव्यार्थ नस्तोचि होती ॥ तनू हे चि-
तेमाजि कीं बोळवीती ॥ असें जाणुनी हीत

कांहीं करीं रे ॥ हरेराम हा मंत्र० ॥११॥
कुटुंबी स्त्रिया पुत्र ते दास दासी ॥ बहू पो-
षिसी सोसुनी दुःखराशी ॥ त्यजीं भार
काबाड वोझें किती रे ॥ हरेराम० ॥१२॥
बहू इच्छिसी कीर्ति सन्मान कांहीं॥सुखा-
चा तुला अंतरीं लेश नाहीं ॥ फुकाचें मुखीं
नाम तें कां न ये रे ॥ हरेराम हा० ॥१३॥
रवीसूनुचे दूत विक्राळ येती ॥ तुझ्या लिं-
गदेहासि ओढून नेती ॥ तुला खंडिती मुं-
डिती दंडिती रे ॥ हरेराम हा० ॥ १४ ॥
नको वीषयीं फारसा मस्त होऊं ॥ नको
मान दंभांमधें चित्त गोवूं ॥ नको भस्म ला-
वूं जटाभार कीं रे ॥ हरेराम हा० ॥ १५ ॥

नको फार मंत्राग्निच्या मंत्रदीक्षा ॥ नको
जारणामारणादी अपेक्षा ॥ कळायुक्त चा-
तुर्य ती वीकळा रे॥हरेराम हा मंत्र०॥१६॥
नको योग अष्टांग तो रोध प्राणा ॥ नको
कृच्छ्रचांद्रायणीं हट्ट जाणा ॥ अपभ्रंश हा
मार्ग कीं वोखटा रे ॥ हरेराम हा० ॥ १७ ॥
कदाही न होती व्रतें यज्ञ दानें ॥ नसे द्रव्य
गांठी करावें जयानें ॥ घडे नाघडे यद्यपी
कां फुकारे ॥ हरेराम हा मंत्र सो० ॥ १८ ॥
नसे सत्य कांहीं दिसे दोंदिसांचें ॥ तुला
लूटीती चोरटे लोक साचें ॥ स्त्रिया पुत्र
कामा नयेती तुलारे ॥ हरेराम हा०॥१९॥
नको तूं कदापी करूं तीर्थयात्रा ॥ तनूदंड-

भारत 292

णीं क्षीणता सर्व गात्रा ॥ करी ग्रस्त आयु-
ष्य तूं कोणसा रे ॥ हरेराम हा० ॥ २० ॥
तुला काळ पाशीं करी बद्ध जेव्हां ॥ सखा
कोणता सोडवी सांग तेव्हां॥ यमाला क-
दापी दया ते नये रे॥हरेराम हा० ॥२१॥
तपस्वी मनस्वी भले पार गेले ॥ दुजी सृ-
ष्टिकर्ते असे थोर मेले ॥ चिरंजीव कल्पायु
गेले किती रे ॥ हरेराम हा मंत्र० ॥ २२ ॥
बहू कामधंद्यांमधें धांव घेसी ॥ किती ना-
मरूपां जगीं मीरवीसी ॥ कशाला तुला
उंट घोडे नगारे ॥ हरेराम हा मंत्र० ॥२३॥
ह्मणे देश माझे क्षिती गांव वाडे ॥ शिबी-
कासनीं बैससी उंच लोडें ॥ कसा उंच तूं

मंचकीं लोळसी रे ॥ हरेराम हा० ॥ २४॥
दशग्रीव लंकापुरीं मस्त झाला॥अकस्मात
गेला पुरीमाजि घाला ॥ चिरंजीव दे राज्य
बीभीषणा रे ॥ हरेराम हा मंत्र० ॥ २५ ॥
अधोमूख विष्टमधेंमायपोटीं ॥ पचे पिंड हा
सोसुनी दुःखकोटी ॥ स्मरेना कसी लाज
नाहीं तुला रे ॥ हरेराम हा मंत्र० ॥२६॥
असें भोगुनी पंचचत्वारि मासीं ॥ पुढें दैव-
योगें सख्या जन्म घेसी ॥ कसा वीसरे ध्या
न सोहं पुढें रे॥ हरेराम हा मंत्र ०॥२७॥
कळे वायुचा स्पर्श होतांचि जेव्हां ॥ रडे
बाळ कोहं ह्मणे जीव तेव्हां ॥ पुढें खेळ ना-
नापरी खेळसी रे ॥ हरे राम हा० ॥ २८॥

दिसेंदीस माता पिता बंधु जाणे ॥ परी
रोग तेथें करीतीच ठाणें ॥ जरी दैवयोगें
पुढें वांचला रे ॥ हरेराम हा मंत्र० ॥२९॥
करी लग्नमुंजी पिता माय त्याचें ॥ करी शा
हणा मागुती रूप साचें ॥ करी पोटधंदा
भला चांगला रे ॥ हरेराम हा मंत्र० ॥३०॥
बहू पाळिलें पोशिलें मायबापीं ॥ निघे भि-
न्न निंदूनियां पापरूपी ॥ स्त्रियेचे मुळें शे-
वटीं दुर्गती रे ॥ हरेराम हा मंत्र० ॥ ३१ ॥
शतायू नव्हे पूर्णआयुष्य कांहीं ॥ असे ही-
त आहीत तें अद्य पाहीं ॥ अशाहीमधें बा-
ल्य तारुण्य सारें ॥ हरेराम हा मं० ॥ ३२॥
करीशील धर्माश्रमा अस्त जेव्हां ॥ बहू घा-

तपाती घरी होय तेऱ्हां ॥ भरीं पोट पाशीं कुटुंबा बरा रे ॥ हरेराम हा मंत्र० ॥ ३३ ॥
रवीऊदयोअस्त तो पोटधंदा ॥ स्तवी आ जेवी तो करी येरनिंदा ॥ कळेना पुढें काय होणार तें रे ॥ हरेराम हा मंत्र० ॥ ३४ ॥
बहू ढोंग मागेंपुढें मोहरांचे ॥ मदोन्मत्त हो- ऊनियां तेथ नांचे ॥ असे गर्व त्यालागिं नर्कासि थारे ॥ हरेराम हा मंत्र सो० ॥ ३५ ॥
अळंकारजागीं तनू साजवीतो ॥ मना दर्प णीं पाहुनी रंजवीतो ॥ कळेना जळे सर्प- णीं रूप तें रे ॥ हरेराम हा मंत्र० ॥ ३६ ॥
बहू द्रव्य गांठीं पुन्हा मेळवीसी ॥ गुरू वि- प्र बंधू कसे चाळवीसी ॥ दुराशा कशाला

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

मशाला पुढें रे ॥ हरेराम हा मंत्र०॥३७॥
जरी क्षीण देह परी वृद्धकाळीं ॥ करीती
स्त्रिया सूत नातू टवाळी ॥ धना ऊचली
लागतां गूचकी रे ॥ हरेराम हा मं०॥३८॥
रवी जे घडी हाणितो काळ जेव्हां ॥ श्रुती-
शब्द हे गर्जती तास तेव्हां ॥ ह्मणे क्षीण
आयुष्य गेलें तुझें रे ॥ हरेराम हा० ॥३९॥
कशी जन्मुनी माय त्वां वांझ केली ॥ क-
शी लाज वंशा कुळा लावियेली॥ भुमीभार
धोंडा पशू हा खरा रे ॥ हरेराम हा०॥४०॥
कसा कोणता काळ येईल केव्हां ॥ दि-
नासारिखा काळ नेईल तेव्हां ॥ तुझें वित्त
तारुण्य लोपेल सारें ॥ हरेराम हा०॥४१॥

सं.का०य
२५



तुला दंडिती मुंडिती कुंभिपाकीं ॥ तुला खंडुनी अग्निकुंडांत टाकी ॥ तुला ओढिती सांडसें तोडिती रे ॥ हरेराम हा० ॥४२॥
असे हाल भोगूनियां कल्पकोटी ॥ पुन्हा जन्म घे लक्षचौऱ्यांशि कोटी॥महासंकटीं हिंपुटी जीव सारे ॥ हरेराम हा० ॥४३॥
नको सोंग छंदें करूं ढोंग कांहीं ॥ नको शिष्यशाखा मठीं सूख नाहीं ॥ महंतीमुळें नाश होतो तपा रे ॥ हरेराम हा०॥४४॥
नको चाउटी वाउगी या जनासी ॥ हरी-चिंतनीं ध्यास लावीं मनासी ॥ अमोली-क हा काळ जातो वृथा रे ॥ हरे० ॥४५॥
महाघोर हा थोर संसार मोठा ॥ कळे सं-

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

तसंगीं समूळींच खोटा ॥ कळे भुक्ति मुक्ती विरक्तीचगारे ॥ हरेराम हा मंत्र सो० ॥४६
त्यजा दुष्टसंगासि पाहा भल्यासी ॥ करा हीत येऊं नका गर्भवासीं ॥ पहा अंतिचें दुःख होतें जिवारे ॥ हरेराम हा० ॥४७॥
बहूभोगतां पूढती नर्क आहे॥असें जाणुनी त्या सुखामाजि राहें ॥ प्रपंचीं उगा मारि सीकां गपारे ॥ हरेराम हा मंत्र० ॥ ४८ ॥
कळे साधनें याविणें सर्व निंदी ॥ हरेराम हा मंत्र जो त्यासि वंदी ॥ हरेराम हे माळिका साधका रे ॥ हरेराम हा मंत्र सोपा जपा रे ॥ ४९ ॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥

## भावीकजनांस उपदेश.

पद. ( उद्धवा शांतवनकरजा—याचालीवर. )

राम राम बोला वाणी, मन लावा राघवचरणीं ॥ ध्रु० ॥ कर्मतत्व गहन कळेना, कळलें तरि सांग घडेना ॥ कर्तृताभिमान उडेना, कामाचा दोष झडेना ॥ ब्रह्मार्पण बुद्धि जडेना, पुण्यांशीं गांठि पडेना ॥ अंधारि–निशा उजडेना ॥ हित कोठुनियां आडरानीं ॥ राम राम बोला वाणी, मन लावा राघवचरणीं ॥ १ ॥ साधूचा संग धरावा, नाहीं ज्या आप परावा ॥ स्वकरें तच्चरण चुरावा, कीर्तनीं करा सुगरावा ॥ भवसिंधु सुखें उतरावा, जन्माची हो

य शिराणी (नाहींपणा) ॥ राम राम०॥२॥
विषय हे विषापरी विटती, स्वयमेव क्लेश
हि सुटती ॥ वासना मूळही आटती, चित्ता
च्या वृत्ती तुटती॥ ज्ञानांकुर हृदयीं फुटती
सहज सर्व संशय फिटती ॥ कर्मबंध सह
सा तुटती, स्वानंदसुखाची खाणी ॥ राम
राम० ॥ ३ ॥ शास्त्रदीप घेउनि निघतां,
निगमागम शोधुनि पाहतां ॥ संतांसी हि
तगुज पुसतां, सुगम हाचि दावी पंथा ॥
आहेत मतांतर-कंथा, ज्या रुचल्या नाहीं
अनंता ॥ म्हणुनि हाचि विठ्ठलपंता, पथ
[illegible] निर्मळ वाणी ॥ राम राम बोला
[illegible]र्गी, मन लावा राघवचरणीं ॥ ४ ॥



हें पुस्तक वासुदेव मोरेश्वर पोतदार, कांदे-
वाडी, मुंबई यांजकडे विकत मिळेल.